३. सन. १८७८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ८८

...ांच्या

# "समाधीवर फुलें."

सं. काव्य ८८८
काव्य नं. ८८८
REFBK-0001704
REFBK-0001704

...'कमलासुत.'

# 'गोविंदाग्रजां'च्या
# " समाधीवर फुलें."

लेखक–' कमलासुत.'

REFBK-0001704

कि. २ आणे.

Printed by K. R. Mitra, at the Manoranjan Press,
3, Sandhurst Road, Girgaon,
and Published by Shantaram Balkrishna Kotwal, B. A.,
at Topiwalla's Saraswati Chawl, Grant Road, Bombay.

ठाणे

कधिंतरि, कळे ! वाटे त्याचें पडेल कलेवर ?
कधिंतरि जगा ! कृष्णच्छाया चढेल कलेवर ?
जरि करि महानिद्रा; त्याचीं जिवंत असतीं मुलें.
ह्मणुनि उधळीं आनंदें हीं समाधिवरतीं फुलें.

ठाणे

# प्रकाशकांचे दोन शब्द.

आमचे परम स्नेही श्रीयुत 'कमलासुत' यांनीं आपल्या गुरुवर्यांच्या पुण्य 'समाधीवर' उधळलेलीं हीं दिव्य 'फुलें' आज आम्ही पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहों. ती. कै. गडकरी निवर्तले त्यांत, आणि या पुस्तकाच्या प्रकाशनांत बराच कालक्षेप झाला खरा; परंतु त्याला अपरिहार्य अडचणी—विशेषत: लेखकाच्या प्रकृतीचें अकाल अस्वास्थ्य-हें एकच कारण होय. तरीसुद्धां दिरंगाईचा हा अल्पसा दोष काव्याच्या तेजोमय प्रभेंत धुऊन निघेल, असा भरंवसा वाटतो.

या काव्याविषयीं दोन शब्द लिहिण्याचा मोह अनावर होतो; परंतु तें काम उद्यानाचे संपादक श्री. गणेश विठ्ठल कुळकर्णी यांनीं आपल्या प्रस्तावनेंत उरकलें असल्यामुळें आह्मीं त्यापासून अलिप्त रहावें हेंच बरें. श्रीयुत कुळकर्णी यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून या मखमालीच्या शालूला जरतारी किनारी जोडून तिला विशेष शोभायमान केल्या-

बद्दल, आणखी इतर प्रकारें पुस्तक पुढें येण्यासंबंधीं जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

पुस्तकाची किंमत अवघी दोन आणे ठेवली आहे; आणि हल्लींच्या महागाईच्या काळांत लोकांना ती फार वाटणार नाहीं, अशी आशा आहे.

**शांताराम बाळकृष्ण कोतवाल.**

मुंबई,
१।४।१९१९.

# परडी.

आमचे स्नेही, मराठी काव्यांगणांतील आपल्या पहिल्याच पावलांनीं केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि ठोमरे यांची परंपरा चालविण्याचीं स्पष्ट चिन्हें दाखविणारे नूतन कवि श्री. 'कमलासुत' यांनीं त्यांनां गुरुस्थानीं असलेले महाराष्ट्राचे कविश्रेष्ठ राम गणेश गडकरी यांच्या समाधीवर फुलें घालण्यासाठीं एक काव्यमाला गुंफिली आहे. रा. गडकरी हे एक प्रतिभासंपन्न, नवीन विचारांचे, उदात्त ध्येययुक्त कवि होते, याविषयीं दुमत नाहीं. मनुष्याच्या व राष्ट्राच्या सर्वांगी जीवनाला पोषक असे विचार हा उत्तम काव्याचा आत्मा होय. अशा प्रकारचे विचार व त्यांना पोषक अशा हृदयंगम कल्पना यांच्या अभावीं कविता ह्मणजे केवळ शब्दचमत्काराचा पोकळ डोलारा होऊन राहतो. कवितेचें कार्यक्षेत्र जरी तत्त्वज्ञानाच्या कार्यक्षेत्रापेक्षां भिन्न स्वरूपाचें असलें, सत्काव्य ह्मणजे प्राधान्यें करून जरी सौंदर्याची मूर्ति असली तरी खरें सौंदर्य हें सत्य, न्याय, दया, सहानुभूति, यांनां सोडून केवळ शृंगाराला चिकटून कधींच राहूं शकत नाहीं. 'Beauty is truth & truth is beauty'

या वाक्यांतील मर्म तरी हेंच आहे. म्हणून खरें काव्य ज्याप्रमाणें मानवी जीवनाला सौंदर्याची ओळख करून देऊन त्यांत आनंदाची भर घालतें त्याचप्रमाणें तें त्या सौंदर्याशीं नेहमीं संलग्न असलेल्या 'अनंत विश्वचालकाच्या' साक्षित्वापासून व त्याच्या उज्वल स्वरूपाच्या दर्शनापासून कधींही वेगळें राहूं शकत नाहीं. कविजनांच्या देवदर्शनाच्या मार्गावरून त्यांत केव्हां केव्हां अज्ञेयत्वाची छटा स्पष्ट उमटलेली दिसते, तरीसुद्धां त्या अज्ञेयत्वामुळेंच कविकृति अधिक गंभीर, प्रगल्भ व चटकदार अशी होते. कारण, कवीनें रंगविलेल्या चित्रामुळें प्रत्येक सहृदय वाचकाचें व जिज्ञासूचें चित्त थरारून जाऊन तें वाईट व संकुचित विचारांपासून पराङ्मुख होतें. सत्कवि आपल्या कृतीनें मनुष्याला अदृश्याचें दर्शन व अनंताचें सान्निध्य पटवून देतो तें याचमुळें. उन्नत कल्पना व धीरोदात्त विचार यांमुळेंच मनुष्याच्या बुद्धीला, मनाला व आत्म्याला चलन मिळून त्याची बुद्धि, त्याचें मन आणि त्याचा आत्मा हीं शुद्ध वातावरणांत वावरूं लागतात; आणि संसारांतील दुःखें विसरतात अगर त्यांजवर आत्मबलानें जय मिळवूं शकतात. कवीचें कार्य अशा प्रकारचें

आहे.रा. गडकरी यांचें काव्य केवळ Fancy व Imagination यांच्या भराऱ्या, म्हणजे वर एके ठिकाणीं उल्लेखिलेला 'शब्दचमत्काराचा पोकळ डोलारा' नसून त्यांत मर्म, रहस्य व मानवी संसारांतील लढ्यांची तीव्र जाणीव हीं आहेत. त्यांचें काव्य रसिकाला संकुचित स्वार्थापासून मुक्त करून जगाच्या संसाराविषयीं, मानव जातीच्या दुःखांविषयीं विचार करण्यास उद्युक्त करतें. म्हणूनच त्यांच्या काव्याची गणना श्रेष्ठ प्रतींत होऊं शकतें. दसरा राजहंस, घुंगुरवाळा, केशवसुत इत्यादि काव्यें आमच्या विधानाचें प्रत्यंतर देतील. त्यांच्या काव्याची भाषा सुंदर, मधुर, सरळ व मनास चटका लावणारी असून त्यांचा काव्यसंग्रह मराठी भाषेंतील Classic होण्यास सर्वथैव पात्र आहे. रा. गडकरी यांचें काव्य सर्वप्रकारें निर्दोष असून त्यांतील विचार व कल्पना अनुकंपायुक्त आहेत.

रा. गडकरी यांचा आत्मा tragedyमय होता. ठरविलेल्या उच्चतम ध्येयाप्रत पोंचण्याच्या त्यांच्या प्रयत्नांशीं, त्यांची प्रतिकूल परिस्थिति, त्यांचे आनुवंशिक संस्कार, त्यांचीं प्रापंचिक दुःखें इत्यादिकांचा दारुण संग्राम त्यांच्या मनोभूमीवर सारखा चालल्यामुळें त्यांचें सारें जीवन यातना-

मय झालें होतें; आणि स्वतःला ध्येयपूर्ण आयुष्यक्रम साधतां आला नाहीं तरी ध्येयपूर्ण असणें म्हणजे काय याचीं हुबेहुब चित्रें त्यांनीं आपल्या 'प्रेमसंन्यास,' 'पुण्यप्रभाव,' 'एकच प्याला,' या नाटकांत रंगविलीं आहेत. त्यांचें जीवन tragedy नीं भरलेलें होतें; अरिस्टॉटलनें tragedy चें कार्य purging of the emotions असें जें ठरविलें आहे तें रा. गडकरी यांच्या काव्यानें उत्तम प्रकारें होतें. वाचकांच्या मनोवृत्ती व त्यांचीं अंतःकरणें यांतील घाण धुऊन काढून तीं शुद्ध, उन्नति–प्रवृत्त, धीरोदात्त आणि सात्विक व अन्यायाची चीड येईल इतक्या तीव्र जाणिवेनें युक्त करण्याचें सामर्थ्य त्यांच्या काव्यांत आहे. म्हणूनच केशवसुतांप्रमाणेंच आम्ही रा.गडकरी यांना नव्याचे पुरस्कर्ते असें म्हणतों. अशा कविश्रेष्ठांच्या कृतींचा जेवढा गौरव व प्रसार होईल तेवढा तो आपल्या भावी उन्नतीला हवाच आहे. या दृष्टीनें रा,कमलासुत यांचीं "समाधीवरील फुलें" ही कविता रसिकांनीं सत्कारानें संग्रहीं ठेवावी अशी आम्ही शिफारस करतों. रा.कमलासुत यांची पहिली कविता* वाचून

---

* ही कविता '१९१३' या मथळ्याखालीं 'उद्यान'च्या फेब्रुआरी १९१७ सालच्या अंकांत आली आहे.

रा. गडकरी यांनीं "आतां माझें कार्य संपलें, आतां मीं कविता करणें बंद केलें तरी चालेल" असें त्यांजबद्दल मोठ्या अभिमानानें म्हटलें होतें. रा. गोविंदाग्रज ज्याप्रमाणें केशवसुतांचे त्याचप्रमाणें रा. कमलासुत हे गोविंदाग्रजांचे 'सच्चे चेले' शोभतात, हें त्यांच्या स्वतंत्रपणें समाजापुढें येणाऱ्या पहिल्या कवितेवरून सहज समजून येईल. कविश्रेष्ठ गडकरी यांची गुणमत्ता व त्यांचे सच्छिष्य रा. कमलासुत यांची आदरयुक्त उत्कटता या दोहोंमुळें 'समाधि' व ' तीवरील 'फुलें' या दोन्ही गोष्टी परस्परांस शोभा देणाऱ्याच झाल्या आहेत. त्या समाधीवरील फुलांसाठीं माझ्या प्रस्तावनेचा परडीप्रमाणें उपयोग होऊन रा. गडकरी यांजबद्दलच्या स्नेहऋणाचें अंशतः उतराई होण्याची संधी मला दिली, याबद्दल मी रा. कमलासुत यांचा फार आभारी आहें.

२८-३-१९.<br>
उद्यान ऑफिस,<br>
गिरगांव-मुंबई.

गणेश विठ्ठल कुळकर्णी.

वा. क्र. १००४
काव्य नं. ९९६

# समाधीवर फुलें.

रामपादें शिला झाली अहिल्या देवता जशी,
'राम'वाक्प्रभवें झाली मराठी वैखरी तशी;
गोलग्रहमंडलामध्यें भासतो तो जसा रवी,
मराठी शाहिरांमध्यें "गोविंदाग्रज" तसा कवी.

लवली विजली लपली लवकर काय तरी तो चमत्कारा!
तसा वाटतो खेळ शाहिरा! तुझिया प्रतिभेचा सारा;
क्षणांत उपजुनि, चमक दावुनी, पसार झाली गगनांत,
परि तेजोब्रह्मांड सांचलें अमुच्या दिपल्या डोळयांत.
स्वर्गद्वारीं दाटी झाली तुझें गान ऐकायाला
सुरलोकांची, ह्मणुनि धांवसी गात गात कां गगनाला?
देवाशीं संलाप कराया गर्दी झाली कां भारी
विलाप विखरुनि इहलोकीं कां ह्मणुनि जासि देवद्वारीं?

महाराष्ट्राच्या उदय-गिरीवर जों न पातला अरुण–कर
तों मेघांनीं अखंड भरिलें तिमिरानें गगनद्वार.

त्या ध्वांताला भेदुन आले कर भूमीवर उजळपणें
झळंब दिसला एक प्रहरभर नयनें दिपलीं दीप्तीनें
क्षणैक मिटुनी डोळे धरिले महाराष्ट्राच्या रसिकांनीं
आणि उघडिले मात्र बघाया तेजाची निमती ग्लानी.

काय शाहिरा! चपळ गति तरी निमिषार्धाचा अवकाश
तोंच प्रभातीं संध्या झाली ध्वांताचा ये पाऊस.

उथव उमेदीला भाषेच्या आला केवळ निमिषभर
ऐन् ज्वानीच्या चढत्या काळीं 'राम'निमाला खरोखर.

आकाशींच्या कुऱ्हाडिचा हा अकस्मात् घाला आला
तुटकें मंगलसूत्र घेउनी सरस्वती हतबल बाला

विषण्ण चित्तें बसलि; शारदा–प्रांत सारखा कळवळला
अश्रूंनीं तर तुडुंब भरली विशाळ विश्वाची शाळा.

धडधडणारी चिता पोंचवी हे कोणाचे संदेश
ज्वाळेसरशीं एक एक हे कंपित करुनी स्वदेश?

आगीचें हें विमान नेतें वरतीं कोणाचा प्राण ?
इहलोकींच्या बृहस्पतीनें भरेल कां तेथिल वाण ?
देव-कवींची वाणी खुटली अथवा जिव्हा बोंथटली
ह्मणोनि निर्दयतेनें अमुचीं रत्नें कां ओढुनि नेलीं ?

एका मागुन एक सारखीं मोलाचीं हीं कवि-रत्नें
मिळतिल कां ब्रह्मांड उलथलें जरि भगीरथाच्या यत्नें ?
अनंत काळा ! अनंत जरि तूं, महाराष्ट्र कवि-परंपरा
तशी अनंता; कळेल तुजला, अमुची नच ही वांझ धरा.

मायभाषेची कूस प्रसविल अनेक असले शाहीर
पिढ्या पचविणें काम तुझें; ती समर्थ निर्मिति करणार.
चिता धडधडे, चिता नव्हे ती निशाण तेजाचें आहे
ध्वज आहे तो सौभाग्याचा, खूण यशाची ती आहे.

आज जरी शोकोद्वेगानें कच्चें दिल् फाटुनि गेलें
उद्यां प्रगटती असंख्य ठिणग्या, नवे नवे प्रतिभावाले.
अश्रूंच्या सरिता वाहूंद्या आज कवीस्तव घरोघरीं
उद्यां वाहविल नद कवितेचे त्याची पुण्याईच खरी.

शोकाचें हें वाक्य जाउं द्या, विराम धीराचा द्यावा
हें बरवें कीं नित। वाणीनें गुणगौरव त्याचा गावा.

भाषेचें जों जीवन तोंवर चिरंजीव तो होणार
जरामृत्युवांचून तयाचा जीव सर्वभर भरणार.

जीवाचा चंडोल उडाला मारि भरारी गगनांत
ह्मणून कां तूं खुळ्या मराठी रसिका बुडसी शोकांत?

गरगरत्या गिरकींत फेंकितो स्फूर्तीचे कण ना खालीं?
गुंफा रे, चेल्यांनों गुंफा कवितेचीं सुंदर जाळीं.

कवीश्वराची गुंफा सजवा पसरा तीं गुंफित जाळीं,
आणि हांसवा मूक शारदा करुं द्या तिस मंगलकेलि.

आनंदानें हर्षित सुमनें वाक्सुमनें मग फेंकील
आवडता आपुला कवीश्वर दिव्य गायनें गाईल.

परिसाया तीं मंजु गायनें मंगलचित्तें चला तरी
धीर पांगळा काय जाहला—वृथा वल्गना करा पुरी.

प्रेरक गाणीं किती तयाचीं प्रेतां जागृति देणार
आणिक तुम्हीं जिवंत प्रेतें बनुनी रडतचि बसणार?

आश्चर्यांची मूठ उधळली, उडत पसरली चहूंकडे
एकामधुनी एक अशीं तीं उलत चाललीं ना तिकडे ?
परार्ध थकतिल गणित कराया गुणाकार जो वाढतसे
त्या नवलांचा एकसारखा, विश्वदिशा व्यापून बसे.
बुद्धीच्या त्या नवलाईचें वर्णन करणें कसें तरी
त्या वाणीचा, त्या जिव्हेचा अर्थ करावा कुणी तरी !
अल्पकाळ त्या जीवाची । सरसरोनि सरही गेली
उडविले सुखे शिंतोडे । कवितेची दुनिया पिकली
वाटलें मेघवृष्टी ती । होईल अखंडित येथें
शारदा–वारिसंपात । भिजवील वृष्टिनें जें तें
परि फोल आस ही झाली
वरच्यावर वृष्टि पळाली
नवलाची परि ही बोली
जों पळभर सर नच पडली । कवितेची दुनिया पिकली.
तें कलम कुणाचें होतें ? । वाहवी झरा बुद्धीचा
कल्पनाहि ती कोणाची ? । डोलवी डोल जनतेचा
हृदय तें तरी कोणाचें ? । हलवि जें प्राण दगडांचा

तो " राम " असे भाषेचा
तो राम असे कवितेचा
तो राम रसिक चित्तांचा
त्यानेंच जादु ही केली । कवितेची दुनिया पिकली.

ती धडकी त्या हृदयाची । जनमनामधें ना भरली ?
चेतनाहि त्या जीवाची । ठायिं ठायिं भरुनी उरली
विश्वेंच उजाड मनाचीं । त्या स्फूर्तीनें रसरसलीं
त्याचि जों चेतना शिरली
तों अंगेंही थरथरलीं
रोमरोमिं कविता भरली
ही लीला त्यानें केली । कवितेची दुनिया पिकली.

अधिकारि अशा वाणीनें । शतकांचि झोंप घालविली.
काव्याचें सिंचुनि पाणी । भाषेस टवटवी दिधली.
ती मूर्तिमती नाट्यकला । वाटलें जगीं अवतरली.
बुद्धिची धांव तरि कसली ?
हृदयांची मापुनि खोली
सांदींत कुठें दडलेली
सुविचार–सृष्टि दाखविली । कवितेची दुनिया पिकली.

नानाविध चित्तांमध्यें । तव प्रवेश कैसा झाला ?
विविध भाव हुडकायाला । तुज वाव कुठोनि मिळाला?
गवसला कुठें दरवाजा । तुज विरोधि चित्तांमधला ?
हृदयांच्या नाजुक तारा,
वृत्तींचा सर्व पसारा,
दृष्टांत मनोमन सारा
एक ठायिं गोळा झालीं । कवितेची दुनिया पिकली.

वाक्सृष्टीचा निर्माता । सृष्टीचा मार्मिक श्रोता
नरनिसर्ग यांचा भोक्ता । एकला कवीश्वर होता
तें कलम खालतीं पडतां । कां जीव निमाला ह्मणतां ?
काळाचा फसवा कावा
त्या मुळेंच जीव फसावा
कां इतुका भोळा व्हावा
जनतेचा भाव; न सुकली । कवितेची दुनिया पिकली.

भाग्यहीन महाराष्ट्राचा । दिन लपला पुरुषार्थाचा
सुळसुळाट झाला होता । बुजगल्या चित्तवृत्तींचा
माजला चहुंकडे होता । थयथयाट कृत्रिमतेचा

९०७९


नाचरंगिं जन ते दंग
बुद्धीचे तैमुरलंग
त्यांसवें देशही गुंग
ती गुंगि अतां झाडाया। कवितेची पिकली दुनिया.

एकवार वाटे मजला। कडकडोनि फांटो गगन
दशदिशीं भडकुनी ज्वाला। जावोच धरा भंगून
ब्रह्मांड गिळावें सारें। झणिं प्रळयकाळ जन्मून
परि मंजुळ रव आशेचा
बोलतो बोल स्फूर्तीचा
"कां झरत बोल डोळयांचा ?"
"ती वाणी गाउनि गेली।" 'कवितेची दुनिया पिकली.'

नैराश्य क्षणांत निमालें। शंकेची नाव बुडाली
आशामय झालें सारें। भीतीस समाधि मिळाली
सर्वांगीं भरलें वारें। स्फूर्तीची भरती झाली.
आतां परि एकच वार्ता
क्षणभरि जरि भाषा आर्ता
तो काळाचाही कर्ता
निपजवील रत्नें ऐशीं। सारस्वत-सागरिं खाशीं.

दा. क्र. १७०७८.

काव्यरूप सुंदर रत्नें । किति काढिलिं पाणबुड्यानें
घेतला ध्यास जीवानें । सारखा हाच कीं यत्नें—
नच यत्नें परि लीलेनें । लपलेलीं हुडकुन रत्नें

रसिकांस सदा द्यायाचीं
वाग्देवी सजवायाची
मूर्तीहि तशी सत्याची

सौंदर्यें शोभित केली । कवितेची दुनिया पिकली.

गुंफाया कविता–माला । आणाया रत्नें गेला
तों तोच हरपुनी बसला । मग रत्नहार तो कुठला?
जळतळीं स्वस्थ कां बसला! । छे, खोल खोल तो गेला

उज्वलता आणायाला
जों जलांत शाहिर शिरला
तों स्वतांच होउन बसला

सागरांत रत्नांमधला । उज्वलतर रत्नचि झाला.

वाग्देवीचें वरदान । झणिं करी तयाला रत्न
जधिं तेजोमय रत्नांची । त्रिभुवनास भासे वाण
दैत्यदेव स्वबळें जेव्हां । मंथितील सागर मिळुन

तेधवां प्रथम दृष्टीला
येईल रत्न झालेला
उसळून कवीश्वर अपुला
त्या एका उसळीसरशीं । तेजाच्या पडतिल राशी.

गगनांत सर्वभर त्याच्या । चढतील वैभव–ज्योति
धूळीचे कणही अवघे । तेजोमय क्षणांत बनती
त्या झळझळत्या दीप्तीनें । थबकतील विश्वें फिरतीं
गाण्याचे सुंदर सूर
वाऱ्यावर होउनि स्वार
दूरदूर फिरतिल फार
पसरतील महिमा त्याचा । फेर धरुनि ब्रह्मांडाचा.

परि आज महाराष्ट्राचें । जाहलें गान बदसूर
कवितेच्या कंठामधला । तो सूर पळाला दूर
दुमदुमतो वातावरणीं । आवाज जवाचा फार
वेगाचें पळतें गाणें
अंतरांत पुरतें बाणें
नच कल्पांतीं तें विरणें
तो सर्वकाळ टिकणारा । होताच तसा गाणारा.

गातांना ती रसवंती । वठलेल्या वेली फुलती
शब्दाच्या शक्तीवरतीं । उपजवी नव्याची जगती
हरपल्या विश्ववृत्तीही । पटपटा जुळोनी येती
अनुपमशी लेखनशैली
कवितेची नुसती बोली
माणिकेंच हृदयामधलीं
सारखीं मुखांतुनि स्रवलीं । कवितेची दुनिया पिकली.
ती जीवज्योति निमालि ।
जगाची स्फूर्ति मात्र मावळली.
तें मूक जाहलें गान । अतृप्त राहिले कान
हरपलें जगाचें भान । नच आशा कांहीं उरलि ॥
जगाची स्फूर्ति मात्र मावळली.
निःशब्द असें संगीत । वठविलें पुरें गानांत
ठसविले सूर चित्तांत । परि प्रतिभा उडून गेलि ॥
जगाची स्फूर्ति मात्र मावळली.
गतजीवन चित्रांवरतीं । स्मरणाचे तुषार उडती
स्मृतिवांचुन कांहिं न हातीं । ही काय अवदशा आलि?॥
जगाची स्फूर्ति मात्र मावळली

शोकाचे आतां सूर । अश्रूंचे नुसते पूर
फिकटसा मुखावर नूर । सृष्टीहि तमोमय झालि ॥
जगाची स्फूर्ति मात्र मावळली

तो कोण कोठुनी आला । भाषेचा जादूवाला
जगतास मोहउनि गेला । ती कांडि कुठें हारपलि ॥ ज०

गाण्याची संतत धार । ओतितो सदा शाहीर
तो झोत तिचा अनिवार । त्या सरींत सृष्टी भिजलि ॥ ज०

त्या बुद्धीचा उन्मेष । तेजाचा त्याचा वेष
जगिं इर्षाचा करि घोष । कां ग्लानि तयाला आलि ॥ ज०

स्फूर्तीचें गाणें आलें । दगडही हवेंत उडाले
सागरांत पर्वत तरले । मृत्तिकाहि गाणें झालि ॥ ज०

दगडही हवेंत उडाले । कसलेसे पंखहि फुटले
मग गायक पक्षी झाले । तयांची नंतर पुष्पें बनलि ॥ ज०

एक एक गाणें त्याचें । गगनांत उडुनि जायाचें
तारकारूप व्हायाचें । ही गती तयांची ठरलि ॥ ज०

स्मृतिचित्रें मात्र सुरेख । वर्तमान नुसतें खाक
आशेची पुढतीं राख । सुखविलीं मनें हीं असलिं ॥ ज०

हास्याचा दुकाळ चित्तीं । प्रेमाच्या चिंध्या हातीं
नैराश्य पसरलें भोंतीं । सुखसृष्टिच सारि जळालि ॥ ज०

जगताच्या मैदानांत । बोभाळत जीव रहात
आश्वासन त्याला देत । दुःखाचि भ्रांति घालविलि॥ज०

भाषेचा गेला धीर । धीराचा हरपे वीर
वीराचा जीवनतीर । सुटलाच; आस ही खुटलि ॥ज०

'राजहंस' कुणि निजवावा ?। 'मुरलि'चा सूर कुणि गावा!
रूढिचा दुर्ग भंगावा ?। ती शक्ति अम्हांला कुठलि॥ज०

कवितेचा 'घुंगुरवाळा' । घुमविणें, तुझा हा चाळा
तुजवांचुनि कोणी केला ?। सामर्थ्यें शून्य जहालिं ॥ ज०

वाजतें सदा संगीत । गाजतें सकळ गानांत
दिव्याच्या त्या प्रांतांत। कां स्वारि फिराया गेलि ?॥ ज०

दैवाची फिरली दुनिया । सौख्याची सरली माया
शोकाचे पेले प्याया । हा ! हाय ! हतदशा आलि ॥ज०

आत्म्याची गुंगी सरली । ब्रह्माशीं ओळख पटली
जगताचिं बन्धनें तुटलीं । आद्यंतचि एक जहालिं ॥ ज०

ब्रह्मरूप त्याचा जीव । विश्वरूप त्याचा भाव
तद्रूपें भरला वाव । तुज शांति कविवरा झालि ॥ ज०

आशेचे शोधक डोळे । धुंडाया तुजला फिरले
परि पुरें तयांनां कळलें । कीं अनंतता तुज आलि ॥ज०

जधिं वर्षाकाळामधले । पाण्याचे पडतिल भाले
आले तर त्यांतुन आले । तव स्फूर्तीचे सर खालिं ॥ ज०

अजि महाराष्ट्रा ! श्रेय तुझें हारवलें ।
काळानें चोरुनि नेलें.

तो शतकांचा जीवरूप इतिहास ।
मृत्यूचा एकच घांस.

ही मानवता रत्नांची ना खाण ? ।
मग कां तर त्याची वाण ?

तें खनिमधलें रत्न नेइ खाईत ।
काळाचा निष्ठुर हात.

जन झाले का, दैवा ! दावेदार ।
खुडिलास ह्मणुनि आधार.

परि आशेचे आम्हीं भालाईत ।
बसणार नाहिं शोकांत.

या राष्ट्राचा महाकवी येणार ।
रात्रीचा दिन होणार.

त्या पराक्रमी बाळाला सामोरी ।
'रामा'ची गेली स्वारी.

वाग्देवीनें स्वागत करण्यासाठीं ।
हीं फुलें उधळिलीं होतीं.

" बालकवी " " गोविंदाग्रज " असलीं ।
स्फुरणारिं फुलें उधळीलीं.

त्या पुष्पांनीं फुलत्या देहांमधुनी ।
काव्यसुमें दिलिं फेंकोनी

ती ही पायघडी नाजुकशा सुमनांची ।
कवितेच्या कोमलतेची.

तो महाकवी उद्यां बरें आदरिल ।
मृदु पाउल तें उमटेल.

त्यासाठीं ना पक्षी गातिल गाणीं ? ।
पांखरेंहि जमतिल रानीं.
मग मानवता फुलेल आनंदानें ।
विश्वाचें होइल गाणें.
वंदुनियां " गोविंदाग्रज " कविला ।
" कमलासुत " त्याचा चेला
त्या गाण्यांत मिळविल मंगल सूर ।
आशा न कधीं रडणार !

REFBK-0001704
REFBK-0001704
दा. क्र. ९८०४